महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २९ मार्च, २०२३.

क्रमांक:७०२१/क-१ या सचिवालयातील तात्पुरत्या पदोन्नतीमुळे/प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या **"कक्ष अधिकारी"** (एस-१७ : ४७६००-१५११००) या पदावर लेखापाल/सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांची नावे |
|---|---|
| १. | श्री. रो.मो.जाधव, सहायक कक्ष अधिकारी |
| २. | श्रीमती अ.अ.साने, लेखापाल |
| ३. | श्री. ता.मा.मोरमारे, सहायक कक्ष अधिकारी |
| ४. | श्री. प्र.ज.टिबे, सहायक कक्ष अधिकारी |
| ५. | श्री. म.सु.पाटील, सहायक कक्ष अधिकारी (प्रपत्र बढती- मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे विशेष कार्य अधिकारी पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत) |
| ६. | श्रीमती प्र.स.उघाडे, सहायक कक्ष अधिकारी |
| ७. | श्रीमती म.प्रे.किनरे, सहायक कक्ष अधिकारी |
| ८. | श्री. आ.भा.तेलंग, सहायक कक्ष अधिकारी |
| ९. | श्री. सु.ज.उपासकर, सहायक कक्ष अधिकारी |
| १०. | श्री. भा.रो.नार्वेकर, सहायक कक्ष अधिकारी |

२. श्री. म.सु.पाटील यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२, अट क्र. १८ नुसार तात्पुरत्या स्वरुपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील. त्यानंतर श्री.पाटील यांनी या सचिवालयात हजर होणे आवश्यक राहील.

..२/-

३. संबंधित कर्मचाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास, या आदेशातील कनिष्ठतम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) ज्या कर्मचाऱ्यांना सरळसेवेच्या कोटयातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती दिलेली आहे. अशा कर्मचाऱ्यांना सरळसेवेची भरती केल्यानंतर त्यांच्या मूळ पदावर पदावनत करण्यात येईल. तथापि, पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेल्या कोटयामध्ये जर जागा शिल्लक असतील तर त्यांचा पदोन्नतीच्या कोटयामध्ये समावेश करण्यात येईल.

(ई) अनुक्रमांक १,३,५ ते १० वरील अनुक्रमे श्री.जाधव, श्री.मोरमारे, श्री.पाटील, श्रीमती उघाडे, श्रीमती किनरे, श्री.तेलंग, श्री.उपासकर व श्री.नार्वेकर यांना सदरहू पदोन्नत्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहेत. कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची विभागीय परिक्षा विहित संधीत उत्तीर्ण न झाल्यास, संबंधित कर्मचाऱ्यास सहायक कक्ष अधिकारी या पदावर पदावनत करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सायली कांबळी)**
उप सचिव (विधी),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..३/-

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

**प्रतिलिपी :-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

६) सर्व संबंधित कर्मचारी.

७) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

८) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. (संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.)

११) वैयक्तिक नस्ती.

१२) निवडनस्ती.